MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता

Special Issue, August 2019

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास विषयाअंतर्गत

राष्ट्रीय चर्चासत्र

# मराठवाडा प्रदेशाचा प्रवाहित होणारा इतिहास

(इ.स.पूर्व ते इ.स.२०१९)

संपादक

डॉ.मुकूंद देवर्षी

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

66) स्वातंत्र्यपूर्वकाळात डॉ. पंजाबराव देशमुखांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केलेल्या ...
पंकज चंद्रशेखर जयस्वाल, पुणे ||202

67) हैद्राबाद मुक्ती संग्रामातील मराठवाड्याचे योगदान
प्रा.डी.पी.बागुल, जि.अ.नगर ||206

68) सुफी संप्रदाय : मराठवाड्याच्या संत परंपरेतील एक भक्तीपंथ
डॉ. भारत बापू बिचितकर, जि.सोलापूर ||208

69) मराठवाड्यातील दुर्लक्षित 'हलगरा' गाव (लातूर जिल्हा)
डॉ.व्यास सी.पी., जि.परभणी ||211

70) मराठवाड्यातील पर्यटन विकासा संदर्भातील समस्यांचा अभ्यास करुन उपाय सुचवणे
डॉ. प्रा. ढोणे कुसूम बाबूराव, औसा ||213

71) डॉ. निलंगेकर यांनी मुख्यमंत्री म्हणून केलेले कार्य व मराठवाड्याच्या विकासातील योगदान
प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे, जि. लातूर (महाराष्ट्र) ||216

72) मराठवाडयातील प्रमुख राजवंश — नाईक बावणे सरदार
प्रा. अनंत दादाराव मरकाळे, जि. बीड ||220

73) मराठवाडा प्रदेशाच्या विकासाच्या अग्रदुत दैनिक मराठवाडा
प्रा.डॉ. मु.अ.देवर्षी, अंबाजोगाई ||223

74) अजिंठा लेणीतील चित्रकला
प्रा. डॉ. किशोर कुमार गव्हाणे, भूम ||228

75) मराठवाडा मुक्तीसंग्राम व आजचा मराठवाडा
प्रा.बोरकर सुरेंद्र जयवंतराव, जि.लातूर ||232

76) मराठवाडा प्रदेशातील राजवंश आणि त्यांची राज्यव्यवस्था
प्रा.डॉ.बोचरे जे.एम., जि.परभणी ||235

77) मराठवाड्यातील विविध धार्मिक संप्रदाय
प्रा. डॉ. हनुमान मुसळे, जि.परभणी ||237

78) राष्ट्रकुट राजघराण्याचा मूळ वंश व वस्तीस्थान : एक दृष्टीक्षेप
प्रा. पावडे के. डब्ल्यु., कळंब ||240

79) डॉ.शंकरराव चव्हाण आणि जलक्रांतीतून मराठवाडयाचा विकास
प्रा.राजश्री गुणाजीराव भोपळे, अर्धापूर ||242



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

August 2019
Special Issue



78

# राष्ट्रकुट राजघराण्याचा मूळ वंश व वस्तीस्थान : एक दृष्टीक्षेप

प्रा. पावडे के. डब्ल्यु.
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब

**********

**प्रस्तावना :**

राष्ट्राच्या जीवनात इतिहासाचे महत्त्व फार असते. कारण तो भविष्यकालीन वाटचालीसाठी मार्गदर्शकही ठरत असतो. म्हणून इतिहास लेखणाला राष्ट्र जीवनात महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते. परंतु विजेत्या वर्गाकडून स्वतःला अनुकुल असेल अशा पद्धतीने त्याची रचना केली जाते. उदा. व्हिन्सेंट स्मिथ याने आपल्या ग्रंथात (ऑक्सफोर्ड हिस्टरी ऑफ इंडिया) मध्ये भारत देशाच्या इतिहासाला सिकंदर (अलेक्झांडर) च्या स्वारीपासून प्रारंभ झाला असे लिहले आहे. परंतु मागील अनेक वर्षात झालेल्या पुरातत्वीय संशोधनामुळे, शिलालेखांच्या वाचनामुळे, तत्कालीन काळातील कागदपत्राच्या पडताळणीमुळे, ग्रंथाच्या चिकित्सक अभ्यासामुळे मागील पाश्चात्यांनी किंवा ऐतदेशीय विद्वानांनी प्रस्थापित केलेले सिद्धांत, घटना, घडामोडी, नोंदी आज घडीला अस्विकारणीय बनल्या आहेत. भारत देशाला प्राचीन व तो ही अभिमानास्पद असा इतिहास लाभला आहे. हे आज नवनवीन संशोधनाने उजेडात येत आहे. तसेच या नवनवीन उपलब्ध होणाऱ्या ऐतिहासिक साधनांवरून इतिहासाची पुर्ण मांडणी करावी लागत आहे. अशाच प्रकारचा एक प्रयत्न राष्ट्रकुटांचा वंश व त्यांचे मुळ वस्तीस्थान कोणते या शोधासंबंधीचा हा शोध निबंध मांडला आहे.

**राष्ट्रकुट घराण्याचा मुळ वंश व वस्तीस्थान :**

साधारणपणे भारतीय इतिहास संबंधीच्या परिणामकारक किंवा स्मरणीय अशा घटना-घडामोडी (राजकीय) ह्या उत्तर भारतात घडून आल्यामुळे उत्तर भारताचा प्राचीन इतिहास ठळकपणे नजरेत येतो किंवा त्याच भागावर जास्तीत जास्त प्राचीन भारतीय इतिहासासंबंधी लिखाण केले जाते किंवा त्या तुलनेमध्ये दक्षिण भारताच्या इतिहासाकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे दक्षिण भारताचा सविस्तर असा इतिहास अद्यापही उपलब्ध झाला नाही. उत्तर भारताच्या तुलनेत मोठ-मोठ्या साम्राज्याचा अभाव व संशोधकाचे संशोधन संबंधीने झालेले दुर्लक्ष या दोन बाबो त्यासाठी कारणीभूत ठरल्या असाव्यात असे असले तरी अनेक भारतीय इतिहासकारांनी विसाव्या शतकापासून दक्षिण भारतीय इतिहास संबंधी लिखान करून आज अनेक दक्षिणेतील राजघराण्यांचा इतिहास मांडून तो उजेडात आणला आहे. यामध्ये आरंभीच्या काळातील सातवाहन, वाकाटक वंशावरोबरच चालुक्य, पल्लव, चोल व पांड्या या राजघराण्याचा समावेश होतो. यामध्ये राष्ट्रकुट घराण्याचाही समावेश होतो. साधारणपणे भौगोलिक दृष्ट्या तापी-गोदावरी नद्या व विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील आजच्या महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, केरळ व तामिळनाडू या राज्याचा प्रदेश हा दक्षिण भारत म्हणून ओळखला जातो.(1) या मधील महाराष्ट्राचा काही भुभाग मराठवाडा या नावाने संबोधले जाते. या भागावर प्राचीन काळात काही काळ राज्य करणाऱ्या राष्ट्रकुटांनी हर्षवर्धनच्या नंतरच्या काळात भारत देशाच्या राष्ट्रीय राजकारणात काही काळासाठी महत्त्वपूर्ण भुमिका बजावली होती. राजा ध्रुव राजेपदी येईपर्यंत राष्ट्रकुट घराण्याची दक्षिण भारतातील सत्ता अतिशय प्रबळ बनली होती. आंध्र सातवाहन घराण्याच्या नंतर दक्षिण भारतातील या महन राज्यांनी उत्तर भारत जिंकून सर्व देशाचे चक्रवर्ती सम्राट बनण्याची महत्वकांक्षा बाळगली होती. या संबंधी ए. एस. आळतेकर म्हणतात की, इ. स. च्या अठराव्या शताकत मराठ्याच्या सत्तेचा उदय झाला. तेंव्हा पर्यंत दक्षिण भारतातील एकही राज्यकर्त्या घराण्याने उत्तर भारताच्या इतिहासात अशी महत्वपूर्ण कामगिरी बजावली नव्हती. ध्रुव, तिसरा गोविंद आणि तिसरा इंद्र या राष्ट्रकुट राजांनी उत्तर भारतामध्ये सैनिकी मोहिमा नेऊन तेथील प्रबळ राजांवर विजय प्राप्त केला आणि ह्या प्रदेशातील इतिहासाला एक निराळेच वळण लावले. या प्रमाणेच दक्षिण भारतातील त्याचे यश तेवढेच लक्षणीय होते आणि तिसऱ्या कृष्णाने तर रामेश्वरापर्यंत राज्याचा विस्तार केला होता. उत्तर भारतातील प्रतिहार आणि पाल, पुर्वेकडील चालुक्य आणि दक्षिणेतील चोल या महान सत्तांनी त्यांच्या अधिपत्य स्विकारले होते.(2)

असे हे राष्ट्रकुट घराणे हे बऱ्याच काळापासून दक्षिण भारतात वास्तव्य करून होते. डॉ. आळतेकरांनी आपल्या लेखांच्या आधारे दाखवुन दिल्याप्रमाणे रठीक व महारठीक यांची घराणी महाराष्ट्रात व कर्नाटकात मांडलीक म्हणून राहत होती. राष्ट्रकुट नावाची घराणी राजपुताण्यात वास्तव्याला होती. तरी मन्यखेडचे राष्ट्रकुट मात्र मुळचे कुठले हा कुट प्रश्न आहे. आळतेकर मात्र त्यांची कनडी मातृभाषा असलेले मुळचे कर्नाटकातीलच मानतात. राष्ट्रकुट लेखात ते चालुक्यांच्या सैन्यास कर्नाटक बल म्हणून संबोधतात. तेंव्हा



57

Scanned with OKEN Scanner